Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# छत्रपती संभाजीनगर मधील म.न.पा. रुग्णालयातील कंत्राटी महिला सफाई कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन

**रेणुका संजय नवगिरे**
संशोधिका
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
संशोधन केंद्र, जालना

**डॉ.अनिल गाडेकर**
मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख माकनी
बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, माकनी,जि.धाराशिव

**प्रस्तावना :**

छत्रपती संभाजीनगर हे मराठवाडयातील एक प्रमुख औद्योगिक शहर असून येथील विकासाचा वेग अंदाजापलीकडे आहे. या विकासा बरोबरच या शहरात मनपाने शहरातील नागरीकांसाठी अनेक रुग्णालये उभारली आहेत. व या रुग्णालयातील रुग्णांची संख्या बघता या रुग्णालयात कंत्राटी महिला सफाई कामगारांची संख्या ही वाढली असून यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची गंभीरता वाढत चालली आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेतील कंत्राटी महिला सफाई कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यानी ग्रस्त आहेत. त्यांच्या कामाचे समाजात मुल्य मापन होत नाही आणि त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. या महिलांच्या समस्यांवर सखोल अध्ययन होणे गरजेचे आहे.

या संशोधनाचे मुख्य उद्दीष्टे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील कंत्राटी महिला सफाई कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे स्वरुप समजुन घेणे त्यांच्या समस्यांना कारणीभुत घटक ओळखणे आणि त्यांच्यासाठी माध्यमातून या महिलांच्या जीवनातील अनेक संधारलेल्या कोपऱ्याला प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला आहे.

मनपा रुग्णालयातील कंत्राटी सफाई कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन करत असतांना यावरर अनेक लेखकांनी व संशोधकांनी लेखन व संशोधन केलेले आढळुन येते. या लेखनातुन केवळ मुलभुत मुद्यांची सुसंगत माहिती प्रदान करत नाही. तर सफाई महिला कामगारांच्या कामाचे

स्वरुप त्या वर्गाच्या समस्या त्यांचे सामाजिक जीवन अशा विविध अंगानी त्याचे विषयी संशोधन आढळत आहे.

मनपा रुग्णालयातील कंत्राटी महिला सफाई कामगार यांचे बाबतीत संशोधन करित असतांना त्यांना वरिष्ठ अधिकारी व कायम स्वरुपी कामावर असलेले इतर कर्मचारी यांच्याकडून थोडे फार प्रमाणात त्रास होत असतो व त्यांना तो निमुटपणे सहन करावा लागतो. मनपा रुग्णालयातील सर्वच ठिकाणी त्रास होतो असे ही नाही असे आढळून येते.

महिला सफाई कंत्राटी कामगारांमध्ये बहुतेक महिला या शिक्षित नाही तसेच काही महिला थोडेफार शिक्षण घेतलेल्या आढळुन येतात. महिला सफाई कामगारांमध्ये बहुतेक महिला वर्गीकरण करीत असतांना मागासवर्गीय समाजातील महिला जास्त प्रमाणात आढळुन आलेल्या आहेत. सफाई कामगारांचे समाजजीवन पाहत असतांना त्यांच्या जीवनावर थोडफार तरी फरक आढळुन येत असतो. सफाई काम करीत असतांना आपण ही एखाद्या आजाराची लागण होवू नये ही काळजी घेण्याचीही आवश्यकता आहे. ही जाणीव पण ठेवावी लागते तसेच काही महिला अशा काही दुर्धर आजाराशी लागण झालेल्याही आढळुन येतात. मनपा रुग्णालयातील येणारे रोगी व त्यांच्या बरोबर येणारे नातेवाईक हे थोडी ही शिस्त न बाळगता या रुग्णालयात येत असतात त्यामुळे सफाई कामगारांना या समस्यांचीही काळाजी घ्यावी लागते व रुग्णालय स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी सुध्दा पूर्ण करत असतांना समाज जीवनावर परिणाम होत असतो.

मनपा रुग्णालयात विविध आजाराचे विभाग कक्ष असल्याने व कर्मचारी संख्या कमी असल्याने त्याचा ही ताण सफाई कामगारांवर पडत असतो.

मनपा रुग्णालयात सफाई कामगार म्हणून कात करत असतांना मिळणारा पगार व घरातील समस्या या बाबत सुध्दा महिला कामगारांची दमछाक होतांना आढळुन येते.

छत्रपती संभाजीनगर मधील मनपा रुग्णालयातील महिला कंत्राटी सफाई कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन करीत असतांना सदरील वस्तुस्थिती थोडक्यात मांडली आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

- कंत्राटी महिला सफाई कामगारांच्या सामाहिजक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे
- कंत्राटी महिला सफाई कामगारांच्या समस्यांचे कारणे शोधणे
- कंत्राटी महिला सफाई कामागारांच्या समस्यांवर उपाययोजना करणे.

**समुह चर्चा :** महिला सफाई कामगारांचया समूहचर्चा आयोजित करुन त्यांचा अनुभव आणि समस्या जाणून घेतली.

**माहितीचे विश्लेषण :** गोळ केलेल्या माहितीचे विश्लेषण सदरील संशोधन पेपरसाठी इतर आवश्यक संदर्भ ग्रंथ माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट, जर्नल्स व शासकीय दस्ताआधारे माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**महिलांच्य संमस्थेचे स्वरुप :**

**अस्थिर रोजगार :** कंत्राटी असल्याने त्यांना नोकरीची कायमस्वरुपी सुरक्षा नाही. कंत्राटाचा कालावधी संपल्यावर त्यांना नोकरी गमवावी लागु शकते.

**कमी वेतन :** त्यांना पुरेसे वेतन मिळत नाही त्यामुळे त्यांच्या कुटूंबाचे दैनंदिन गरजा पूर्ण होत नाही.

**उपाययोजना :**

- **वेतन आणि भत्ते :** वेतन वाढ, महागाई भत्ता, वैद्यकीय सुविधा, विमा यांची व्यवस्था करावी.
- **कामकाजी वातावरण :** सुरक्षित कामकाजी वातावरण आवश्यक साहित्य आणि उपकरणे उपलबध करुन द्यावे.
- **शिक्षण आणि प्रशिक्षण :** साक्षरता वर्ग, व्यावसायिक प्रशिक्षण स्वयंरोजगारांसाठी प्रोत्साहन देण्यात यावे.
- **कायदेशीर जागरुकता :** श्रम कायदे, महिला अधिकार या बाबत जागरुकता करण्यात यावी.
- **स्वयंसहाय्य गट :** महिला सफाई कामगारांसाठी स्वयं सहाय्य गट तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे.

**म.न.पा.रुग्णालयातील महिलांच्या समस्यांचा तक्ता**

**स्वरुप :**

| **अ.क्र.** | **महिलांच्या समस्यांचे स्वरुप** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| अ) | अस्थिर रोजगार | ३३ | ६६.००% |
| ब) | कमी वेतन | ०५ | १०.००% |
| क) | शिक्षण आणि प्रशिक्षण | ०७ | १४.००% |
| ड) | कार्येशिर जागरुकता | ०५ | १०.००% |
| | **एकुण** | **५०** | **१००.००%** |

**निष्कर्ष :**

कंत्राटी माहिला सफाई कामगारांना त्यांच्या कामाचे तास वेतन आणि इतर लाभ अल्प व अनियमित स्वरुपाचे आहे. महिला सफाई कामगारांना आरोय समस्या भेडसावत असल्याचे दिसून येते कंत्राटी महिला सफाई कामगारांना त्यांच्या शिक्षण आणि प्रशिक्षण स्तर कमी असल्याचे आढळुन आले आहे.

**संदर्भ सुची :**

१) डॉ.आर.के. पाटील (२०१४), महानगरपालिका कंत्राटी सफाई कामगार, कामाची परिस्थिती आणि आरोग्य परिणाम (अप्रकाशित शोध प्रबंध)

२) प्रो. सुषमा कुलकर्णी (२०१८), महापालिका कंत्राटी सफाई कामगार आणि त्यांचे संघटन : एक केस स्टडी (अप्रकाशित शोधप्रबंध)

३) मराठी विश्वकोष, महाराष्ट्र शासन,२०१४.